# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत दि. 16.09.2021 रोजी आढावा बैठकीचा इतिवृत्तांत

मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत दि. 16.09.2021 रोजी आढावा बैठक/व्हीडीओ कॉन्फरन्स संपन्न झाली. सदर बैठकीस उपजिल्हाधिकारी (रोहयो), सहा गट विकास अधिकारी (नरेगा) जि.प.कोल्हापूर, विभागीय वन अधिकारी,सामाजिक वनिकरण,कोल्हापूर, उपवन संरक्षक, वन विभाग, कोल्हापूर, नायब तहसिलदार (रोहयो), रेशीम विकास अधिकारी,कोल्हापूर, सहा.लेखाधिकारी (रोहयो), सहा लेखाधिकारी (नरेगा), जि.प.कोल्हापूर, तहसिलदार, गट विकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण, वन क्षेत्रपाल, वन विभाग, एमआयएस समन्वयक उपस्थित होते.

मा. जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे सूचना दिल्या.

| अ. क्र. | विषय | निर्णय | संबंधित विभाग/कार्यालय |
|---|---|---|---|
| 1 | सन 2022-23 चा कृती आराखडा तयार करणे | 1) कृती आराखडा तयार करण्यासंदर्भात मा. जिल्हाधिकारी महोदयांनी गेल्या बैठकीत दिलेल्या सूचने नुसार नरेगांच्या कामे नमुद असलेला फॉर्म प्रत्येक गावात प्रत्येक घरोघरी वाटण्याबाबत सांगितले होते तसेच तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, वन विभाग व सामाजिक वनिकरणांचे तांत्रिक कर्मचारी यांचा सहभागाने शिवार फेरी इत्यादी कामामध्ये हलगर्जीपणा आढळून आल्याने मा. जिल्हाधिकारी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.<br>2) नरेगाचे फार्म ग्रामसेवका मार्फत 18/09/2021 पर्यंत[1] फॉर्म वाटले पाहिजे व 22/09/2021 रोजी सदर फॉर्म ग्रामसेवकांनी गोळा करावेत अशा सूचना दिल्या.<br>3) वरील कामाची तहसिलदार व गट विकास अधिकारी यांनी खात्री करुन घ्यावी अशा सूचना दिल्या.<br>4) सर्व तालुक्यांनी शिवार फेरीचे नियोजन करावे. केलेल्या नियोजन आज दि.16.09.2021 रोजी या कार्यालयास अवगत करावे.<br>5) सदर कामामध्ये हलगर्जीपणा निदर्शनास आल्यास संबंधित कर्मचारी /अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात येईल असे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले. | तहसिलदार/ गट विकास अधिकारी/ सर्व यंत्रणा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 1) शेतकऱ्यांना वृक्ष लागवडची (बांधावरील वृक्ष लागवड/ रत्ता दुतर्फा वृक्ष लागवड) कामे घेताना त्याबरोबर गोठा, शोष खड्डा अशा प्रकारे वैयक्तीक लाभाची कामे घेणेबाबत प्रवृत्त करावे अशा सूचना मा. जिल्हाधिकारी यांनी दिल्या. | |
| 2 | जॉब् कार्डे | 1) मागच्या बैठकी दिलेल्या सूचना नुसार जॉब कार्ड मागणी अर्ज प्रत्येक गावामध्ये प्रत्येक घरात वितरीत करणे बाबत सांगितले होते.<br>2) ग्रामरोजगारसेवकांनी जॉब कार्ड नोंदणीसाठी अर्जासोबत संबंधीतांचा खाते क्रमांक, आधार कार्ड क्रमांक घ्यावे, त्यामध्ये नांव, अडनाव तपासून पहावे. एकाच कुटुंबातील असल्याची खात्री करुन घ्यावी तसेच मृत व कुंटुंबा व्यतिरिक्त इतर नावे असल्यास त्यांची वगळणी करावी.<br>3) 02.10.2021 नंतर बोगस जॉबकार्ड आढळून आल्यास त्याबाबत ग्रामरोजगार सेवक/कंत्राटी कर्मचारी व गट विकास अधिकारी यांच्या दंडात्मक कारवाई करणेत येईल. | तहसिलदार/ गट विकास अधिकारी/ सर्व यंत्रणा |
| 3 | सेल्फवरील कामे | सर्व तालुक्यांनी 02/10/2021 अखेर ग्रामपंचायत निहाय व यंत्रणानिहाय सेल्फवरती ५ कामे ठेवलीच पाहिजे. जे अधिकारी /कर्मचारी याची अंमलबजावणी करणार नाहीत त्यांना 1000/- रुपये दंडाची कारवाई करण्यात येईल अशा सूचना मा. जिल्हाधिकारी यांनी दिल्या | तहसिलदार/ गट विकास अधिकारी/ सर्व यंत्रणा |
| 4 | ग्रामरोजगारसेवक | ग्रामरोजगारसेवकांची नियुक्ती गट विकास अधिकारी यांनी 2/10/2021 पुर्वी करावी. जिथे ग्रामरोजगारसेवक बदलणे आवश्यक आहे तिथे 02.10.2021 पुर्वी बदलून घ्यावेत अशा सूचना मा. जिल्हाधिकारी यांनी दिल्या. | गट विकास अधिकारी |
| 5 | मजूर उपस्थिती | ग्रामपंचायत मजूर उपस्थिती<br>1) गगनबावडा-120, पन्हाळा-276, शाहूवाडी-0 या तालुक्यांची सर्वात कमी मजूर उपस्थिती आहे.<br>यंत्रणा मजूर उपस्थिती<br>1) तालुका कृषी अधिकारी ,आजरा, गडहिंग्लज, शाहूवाडी यांचे एकही काम सेल्फवरती नाही. पुढील आठवडयात किमान 5 कामे सेल्फवरती ठेवण्यात येतील याची दक्षता घेत आहोत असे तालुका कृषी अधिकारी यांनी सांगितले. | तहसिलदार/ गट विकास अधिकारी/ सर्व यंत्रणा |
| 6 | वेळेत अकुशल मजूरीचे प्रदान | 1) चंदगड तालुका सर्वात कमी 71.23% व हातकणंगले तालुका 77.35% आहे याबाबत उपजिल्हाधिकारी(रोहयो) | तहसिलदार/ गट विकास |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यांनी नाराजी व्यक्त केली.<br>2) गडहिंग्लज, करवीर, राधानगरी या तालुक्यांनी 100% अकुशल मजूरीचे वेळेत प्रदान पुर्ण केले बद्दल उपजिल्हाधिकारी(रोहयो) यांनी अभिनंदन केले.<br>3) उर्वरित तालुक्यातील गट विकास अधिकारी यांनी 100% अकुशल मजूरीचे वेळेत प्रदान पुर्ण होईल याकडे लक्ष द्यावे उपजिल्हाधिकारी(रोहयो) सांगितले. | अधिकारी/ सर्व यंत्रणा |
| 7 | सन 2021-22 साठीचे मनुष्य दिवसाचे लक्षांक व साध्य | 1) मनुष्य दिवस लक्षांकांची गट विकास अधिकारी आजरा तालुक्यांने (152%) व राधानगरी (103%) , तालुका कृषी अधिकारी,पन्हाळा (117.93) यांनी पूर्तता केलेली आहे त्याबद्दल त्यांचे उपजिल्हाधिकारी(रोहयो) यांनी अभिनंदन केले.<br>2) गट विकास अधिकारी गगनबावडा (43.11) करवीर (45.82) पन्हाळा (45.18) यांचा लक्षांक पुर्तता कमी असल्याने उपजिल्हाधिकारी यांनी नाराजी व्यक्त केली.<br>3) तालुका कृषि अधिकारी, आजरा,गडहिंग्लज,राधानगरी, शाहूवाडी झिरो मनुष्य दिवस लक्षांक पुर्तता केली आहे.<br>4)सामाजिक वनिकरण विभागाकडील गारगोटी-16.89, गडहिंग्लज-8.60, मलकापूर-0 मनुष्य दिवस लक्षांकाची पुर्तता केली आहे.<br>5) वन विभागकडील आजरा,भुदरगड व शिरोळ या तालुक्यांचा झिरो मनुष्य दिवस लक्षांक पुर्तता केली आहे.<br>पुढील 10 दिवसांत जास्तीत जास्त कामे सुरु करुन दिलेला मनुष्य दिवसाचे लक्षांक पुर्तता करणे बाबत सूचना उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी दिल्या. | तहसिलदार/ गट विकास अधिकारी/ सर्व यंत्रणा |
| 8 | अपुर्ण कामे | 1) सन 2017-18 मध्ये हातकणंगले तालुक्याने 134 कामाचा सी.सी.अपलोड केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.<br>2) वरील कामांचा सन 2016-17, 2017-18 व 2018-19 तालुकावाईज आढावा घेतला. जिथे कामे बंद होणार आहेत. तिथे सदर कामांचा पंचनामा करुन बंद करावीत.<br>3) सन 2016-17, 2017-18 व 2018-19 ची जी कामे चालू आहेत ती तात्काळ पुर्ण करुन सी.सी अपेलोड करावी अशा सूचना उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी दिली. | तहसिलदार/ गट विकास अधिकारी/ सर्व यंत्रणा |

वरीलप्रमाणे बैठकीत सूचना दिल्यानंतर मा. जिल्हाधिकारीसो यांनी बैठक संपल्याचे जाहिर केले.

(प्रशांत खेडेकर)
उपजिल्हाधिकारी (रोहयो)
कोल्हापूर

प्रति,

तहसिलदार/गट विकास अधिकारी/तालुका कृषी अधिकारी/परिक्षेत्र वन अधिकारी/परिक्षेत्र सामाजिक वनिकरण.

प्रत माहितीसाठी :- जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे स्विय सहाय्यक

प्रत माहितीसाठी :-

१) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कोल्हापूर
२) उप संचालक, सामाजिक वनिकरण, कोल्हापूर
३) उपवन संरक्षक, वन विभाग, कोल्हापूर